धर्म संस्थापनार्थाय अविरत उद्यमाय कृतनिश्चयः

# धर्मराज्य पक्ष

अध्यक्ष
राजन राजे

संदर्भ क्र.________ दिनांक : ९ जून-२०१४

## धर्मराज्य पक्षाचे अध्यक्ष राजन राजे यांची खळबळजनक मागणी

# काश्मीरसाठी असलेले ३७० कलम

# महाराष्ट्रासाठीही लागू करून महाराष्ट्राला स्वायत्तता द्या!

प्रतिनिधी

दि. ९ — जम्मू-काश्मीर राज्यासाठी असलेले ३७० कलम महाराष्ट्रासाठीही लागू करून महाराष्ट्राला स्वायत्तता द्या, अशी खळबळजनक मागणी धर्मराज्य पक्षाचे अध्यक्ष राजन राजे यांनी केली आहे. धर्मराज्य पक्षाच्यावतीने ठाण्यातील शिवाजी मैदानात आयोजित जागतिक पर्यावरणदिनोत्तर 'जनजागृती सभेत' राजन राजे बोलत होते. यावेळी विचारपिठावर प्रसिध्द पर्यावरणवादी लेखक अतुल कहाते, प्रसिध्द राजकीय विचारवंत प्रा. गोपाळ दुखंडे आदी मान्यवर उपस्थित होते.

काश्मीरचे भारतात विलिनीकरण करताना काश्मीरच्या संस्कृतीचे वेगळेपणा जपण्यासाठी आणि काश्मीरच्या जनतेचे जल-जमिन-जंगल-मालमत्ता-भाषा-संस्कृती यांच्या हिताचे संरक्षण करण्यासाठी काश्मीरला ३७० कलमांतर्गत भारतीय राज्यघटनेने स्वायत्तता बहाल केली. यामुळे सैन्य, परराष्ट्र व्यवहार, वित्त आणि दळणवळण वगळता काश्मीर राज्याला आपल्या हिताचे निर्णय घेण्याचा संपूर्ण हक्क देण्यात आला. यानुसार काश्मीर राज्याची स्वतंत्र राज्यघटना, स्वतंत्र कायदे, स्वतंत्र पोलीस दल, राष्ट्रीय ध्वज-चिन्हांसह काश्मिरचा स्वतंत्र राज्य ध्वज-चिन्ह आणि अधिकृत भाषा अस्तित्वात आली. यासह इतर राज्यातील रहिवाशांना जमिन किंवा मालमत्तेची खरेदी-मालकी करण्याचा हक्क नाकारण्यात आला, इतर राज्यातील रहिवाशांना काश्मीरचे नागरिकत्व-मतदान यांचा अधिकार नाकारण्यात आला. दुसऱ्या प्रांतातील मुलाने लग्न केल्यास मुलीचे सर्व हक्क नष्ट होतात तर स्थानिक मुलाने लग्न केल्यास मुलीला सर्व अधिकार बहाल होतात. ३७० कलमामुळे काश्मीर राज्याची संस्कृती-भाषा-वेगळेपण टिकून राहिले आहे. याउलट ३७० कलम नसल्यामुळे महाराष्ट्रात गुजराती-मारवाडी-सिंधी-पंजाबी व्यापाऱ्यांनी मराठी माणसांना त्यांच्या जमिनीवरून-मालमत्तेवरून बेदखल करून महाराष्ट्रातील हजारो एकर जमिनीवर मालकी प्रस्थापित केली आहे. महाराष्ट्राला लुटून अब्जावधींची मालमत्ता गोळा केली आहे. महाराष्ट्रातच मराठी माणसांना गुजराती-मारवाड्यांनी गुलाम करून मराठी माणसांचा आत्मविश्वास संपविला आहे. यामुळे मराठी माणसाच्या न्याय-हक्क-भाषा-संस्कृती तसेच महाराष्ट्राच्या जल-जमिन-जंगल-मालमत्ता आणि पर्यावरणाचे संरक्षण करण्यासाठी महाराष्ट्राकरिताही ३७० कलम लागू करून महाराष्ट्रालाही स्वायत्तता देण्याची खळबळजनक मागणी धर्मराज्य पक्षाचे अध्यक्ष राजन राजे यांनी केली आहे.

सभेचे सूत्रसंचालन जयेन्द्र जोग यांनी केल. तर विचारपिठावर धर्मराज्य पक्षाचे महासचिव राजू फणसे, उपाध्यक्ष नितीन देशपांडे, अण्णा साळुंखे, राजन सावंत, धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघाचे महासचिव महेशसिंग ठाकूर, सचिव रूपेश पवार, स्वायत्त-महाराष्ट्र महिला संघटनेच्या अध्यक्षा जयश्री पंडित, डॉ. श्रीकांत राजे, ठाणे जिल्हा समन्वयक राजेश गडकर, ठाणे जिल्हा सचिव नरेंद्र पंडित, ठाणे शहर अध्यक्ष सचिन शेट्टी, नवी मुंबई शहर अध्यक्ष निवास साळुंखे, जयकांत कदम, जगदिश जाधव आदी पदाधिकारी उपस्थित होते.

ए/एर०३, 'पांचजन्य'-२, रिगलप्लाझा-लोकपुरम प्रिमायसेस् को.ऑ.हौ. सोसायटी, ग्लॅडीज् अल्वारिस मार्ग, पोखरण रोड नं.२, ठाणे (प.)-४०० ६१०, दूरध्वनी : २१७१ ६७२१ / ८१०८१ २५०००

७/६०१-६०२, 'पांचजन्य', शुभारंभ, फेज-१, कोकणी पाडा मार्ग, द्वारा-घोडबंदर रोड, मानपाडा, ठाणे (प.)-४०० ६१०. दूरध्वनी : ६५२७ ०००१ / २७७९ ०६७००

*"सर्व सामान्यांचं जीवन-मरण आणि पर्यावरण, हवं एवढयासाठीच राजकारण!"...*